आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -रात्री ८.०५ वाजता

१७ मार्च २०२४ - रविवार

**ठळक बातम्या.**

- गेल्या दहा वर्षांत भाजपा सरकारनं नवीन प्रारुप विकसित केलं असून त्यात वंचितांना प्राधान्य दिल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- इंडिया आघाडीच्या मुंबईतल्या सभेला दिग्गज नेत्यांची उपस्थिती

- अधिकार आणि विचारांचं केंद्रीकरण झालेल्या भाजपाच्या विचारसरणीविरुद्ध आपल्याला लढायचं असल्याचं काँग्रेस नेते राहुल गांधी यांचं प्रतिपादन

- निवडणूक रोख्यांबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रीकडून डिजीटल स्वरूपात मिळालेली माहिती निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर प्रकाशित

**आणि**

- महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी दिल्ली कॅपिटल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात अंतिम सामना सुरु / नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा दिल्ली कॅपिटल्सचा निर्णय

**<><><><><>**

गेल्या दहा वर्षांत भाजपा सरकारनं नवीन प्रारुप विकसीत केलं असून त्यात वंचित लोकांना प्राधान्य देल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितलं. नवी दिल्लीत काल इंडिया टुडे कॉन्क्लेवमध्ये नमो ड्रोन दीदी योजने अंतर्गंत महिला स्वयं सहाय्यता गटाला एक हजार ड्रोनचं वाटप करण्यात आलं त्यावेळी ते बोलत होते.

महिलांना ट्रॅक्टर चालवता येणारच नाही, ही समाजाची मानसिकता बदलण्यासाठी ग्रामीण भागातील युवतींना कृषी ड्रोनचं वाटप केल्याचं प्रतिपादन

मोदी यांनी यावेळी केलं. महिलांमध्ये उपजत उत्तम काम करण्याचं कसब असतं, त्यामुळेच आमच्या सरकारनं जबाबदार कामांसाठी त्यांची निवड केली आहे. त्यातून त्या आर्थिक आणि तांत्रिकदृष्ट्या ही सक्षम होतील, असं प्रधानमंत्री म्हणाले.

आजमितीला संपूर्ण जग अनिश्चिततेच्या गर्तेत अडकलं आहे. भारताचा विकास मात्र वेगानं होत आहे. विकासाचा हा वेग पाहता लवकरच आपला देश जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेला देश होईल, असा विश्वास प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीची सभा आज मुंबईत, शिवाजी पार्कवर सुरु आहे. या सभेत इंडिया आघाडीनं लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराचं रणशिंग फुकलं. या सभेला इंडिया आघाडीचे दिग्गज नेते उपस्थित आहेत. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे, राहुल गांधी, शरद पवार, उद्धव ठाकरे, फारुख अब्दुल्ला, प्रकाश आंबेडकर, तेजस्वी यादव, स्टॅलिन, तसंच प्रियंका गांधी यांच्यासह काँग्रेसचे राष्ट्रीय पातळीवरचे राज्यातले महत्त्वाचे नेते, राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार आणि शिवसेना उबाठाचे नेतेही लक्षणीय संख्येनं उपस्थित आहेत.

काँग्रेसनेते राहुल गांधी यांच्या भारत- जोडो न्याय यात्रेची सांगता या सभेनं होत आहे. सभेपूर्वी राहुल गांधी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन केलं. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतस्थळालाही त्यांनी भेट दिली.

**<><><><><>**

अधिकार आणि विचारांचं केंद्रीकरण झालेली भाजपची विचारसरणी आणि काँग्रेसची सर्वसमावेशक विचारसरणी असा लढा आपल्याला लढायचा असल्याच काँग्रेस नेते, खासदार राहुल गांधी यांनी म्हटलं. ते आज मुंबईत मणीभवन ते

ऑगस्ट क्रांती मैदानापर्यंत काढलेल्या न्याय संकल्पयात्रेत बोलत होते. देशातल्या सर्वच समाजघटकांवर अन्याय होतोय, मात्र अनेकांना इतरांवरील अन्यायाची कल्पना नसल्यानं, सत्तेविरोधात आंदोलन उभं राहत नसल्याची खंत त्यांनी यावेळी व्यक्त केली.

**<><><><><>**

अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीम या दोन राज्यांमधल्या विधान सभा निवडणुकीच्या मतमोजणीच्या तारखेत आज निवडणूक आयोगानं बदल केला. या दोन्ही राज्यांमधे विधानसभेसाठीची मतमोजणी ४ जून ऐवजी २ जूनला होईल, असं निवडणूक आयोगाच्या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे. दोन्ही राज्यांमधे होणाऱ्या लोकसभा आणि विधानसभा मतदानाच्या वेळापत्रकात अन्य कोणताही बदल नसल्याचंही पत्रकात नमूद केलं आहे.

सिक्किम मध्ये विधानसभेच्या ३२ आणि अरुणाचल प्रदेशात विधान सभेच्या ६० जागांसाठी मतदान १९ एप्रिलला होणार आहे. त्याच दिवशी लोकसभेसाठी ही मतदान होईल. आंध्र प्रदेशात एकाच टप्प्यात विधानसभेच्या १७५ जागांसाठी १३ मे ला मतदान होणार आहे. ओदिशात चार टप्प्यांत विधानसभा आणि लोकसभेसाठी मतदान होणार आहे.

**<><><><><>**

महादेव अँप ऑनलाईन बुकिंग घोटाळा प्रकरणी छत्तीसगढचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल , काही निनावी प्रशासकीय अधिकारी आणि पोलीस अधिकारी यांच्या विरोधात आर्थिक गुन्हे शाखेनं प्रथम माहिती अहवाल दाखल केला आहे. या घोटाळा प्रकरणातला पैसा अनेक शेल कंपन्या आणि शेअर बाजारात गुंतवल्याचा आरोप यात करण्यात आला आहे. तसंच या पैशाच्या मोबदल्यात पोलीस संरक्षणही पुरवण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

<><><><><>

निवडणूक रोख्यांबद्दल सर्वोच्च न्यायालयाकडून डिजीटल स्वरूपात मिळालेली माहिती आज भारत निवडणूक आयोगानं आपल्या संकेतस्थळावर अपलोड करून प्रकाशित केली. निवडणूक आयोगाच्या डब्ल्यू डब्ल्यू डब्ल्यू डॉट इसीआय डॉट जीओव्ही डॉट इन या संकेतस्थळावर कँडिडेट डॅश पॉलीटिकल पार्टी या पर्यायाअंतर्गत ही माहिती सर्वांना पाहता येईल. न्यायालयाच्या निर्देशानुसार राजकीय पक्षांनी ही माहिती सर्वोच्च न्यायालयात सीलबंद लिफाफ्यातून जमा केली होती.

<><><><><>

नवी दिल्लीच्या भारत मंडपम् मध्ये उद्यापासून स्टार्टअप महाकुंभ सुरु होत आहे. भारतातल्या स्टार्टअप्समय वातावरणाचं दर्शन घडवणारा हा उपक्रम 20 मार्चपर्यंत सुरु असेल. स्टार्टअप्स आणि गुंतवणुकदार कंपन्या यांना एकत्र आणण्याचे उद्दिष्ट या उपक्रमामागे आहे. हवामान, कृषी, क्रीडा, गेमींग्स, फिनटेक अशा विविध क्षेत्रांच्या पॅवेलियनमध्ये त्या क्षेत्राशी संबधित स्टार्टअप्सची माहिती मिळेल. प्रधानमंत्री या कार्यक्रमात भाग घेण्याची शक्यता आहे. दहा देशांमधील 2 हजारहून जास्त स्टार्टअप्स, 30 हजार भावी नवव्यावसायिक, 50 हजार व्यापाराशी संबधित तर दहा देशांमधली अनेक शिष्टमंडळं यात सहभागी होत आहेत.

<><><><><>

NTA अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्था, १५ ते ३१ मे दरम्यान CUET-UG ही विद्यापीठ सामायिक प्रवेश परीक्षा आयोजित करणार आहे. या कालावधीत, २० आणि २५ मे या सार्वत्रिक निवडणुकांच्या दोन तारखा आणि परीक्षेच्या तारखा एकाच दिवशी येत आहेत. २६ मार्च या अर्ज भरण्याच्या शेवटच्या तारखेनंतर, CUET-UG साठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या आणि त्यांची राज्यं आणि

मतदारसंघ याविषयी माहिती प्राप्त होईल. ही माहिती आणि निवडणुकीच्या तारखांनुसार, राष्ट्रीय चाचणी संस्था CUET-UG साठी १५ ते ३१ मे दरम्यान होणाऱ्या परीक्षेचं वेळापत्रक जाहीर करील, असं विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष एम. जगदेश कुमार यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

<><><><><>

NIA अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेनं पुणे आयसिस मॉड्यूल प्रकरणात पुण्यातल्या चार स्थावर मालमत्तांवर टाच आणली आहे. या मालमत्तांचा वापर स्फोटकं बनवणं आणि दहशतवादी कृत्यांचं प्रशिक्षण आणि नियोजनासाठी केला जात होता. NIA नं या प्रकरणात सर्व आरोपपत्रं आधीच दाखल केली आहेत.

NIA नं गेल्या काही महिन्यांत वेगवेगळ्या राज्यांमध्ये आयसिसच्या विविध मॉड्यूल्सवर कारवाई केली आहे. आयसिसच्या कटाचा आणि कारवायांचा तपास सुरू आहे.

<><><><><>

दिल्ली जल बोर्डाशी निगडित कथित घोटाळा प्रकरणी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना ई डी अर्थात सक्तवसुली संचालनालयानं समन्स बजावलं आहे. त्यांना उद्या चौकशीसाठी हजर राहायला सांगितलं आहे. केजरीवाल यांच्याविरोधातलं हे दुसरं प्रकरण आहे. यापूर्वी त्यांना मद्यधोरण घोटाळा प्रकरणाच्या चौकशीसाठी आठ वेळा समन्स बजावण्यात आली होती. मात्र ती बेकायदेशीर असल्याचं सांगत ते चौकशीसाठी उपस्थित राहिले नव्हते. या प्रकरणी त्यांना येत्या २१ तारखेला चौकशीसाठी नववं समन्स ईडीनं जारी केलं आहे.

<><><><><>

भारतीय ॲथलिट गुलवीर सिंग यानं अमेरिकेत कॅलिफोर्निया इथं झालेल्या १० किलोमीटर मॅरोथॉन स्पर्धेतल्या कागिरीनं नव्या राष्ट्रीय विक्रमाची नोंद केली. या

स्पर्धेत त्यानं २७ मिनीटं आणि ४१ पूर्णांक ८१ सेकंदाची वेळ नोंदवत १६ वर्षे जुना राष्ट्रीय विक्रम मोडला. या स्पर्धेत त्यानं दुसरं स्थान पटकावलं, मात्र तो पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेसाठी पात्र ठरू शकला नाही.

<><><><><>

राष्ट्रीय स्वयंसेवक संघांच्या अखिल भारतीय प्रतिनिधी सभेत राष्ट्रीय स्वयंसेवक संघांचे सहकार्यवाह म्हणून दत्तात्रय होसबळे यांची पुन्हा निवड झाली. सहकार्यवाह म्हणून होसबळे २०२१ पासून कार्यरत आहेत.

<><><><><>

महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना आज नवी दिल्लीतल्या अरूण जेटली स्टेडियमवर दिल्ली कॅपिटल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात सुरु आहे. दिल्ली कॅपिटल्सच्या महिला संघानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा दिल्ली कॅपिटल्सच्या आठव्या षटकात ३ बाद ६४ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//